



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष २८ वे | अंक ३५३ | पाने ४ | शनिवार | दि. २६ एप्रिल २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# भारताने पाकिस्तानबाबत घेतलेला निर्णय योग्यच


## शरद पवार:सरकारने पाकिस्तानला सडेतोड उत्तर देताना उलटा परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी

**आंबोली/प्रतिनिधी:-**

पहलगाम बैसरन घाटीमध्ये पर्यटकावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानला जो संदेश दिला आहे, तो योग्यच आहे. अशा निर्णयात सर्वपक्षीयांनी सरकार सोबत राहिले पाहिजे. पण सरकारने एखादा निर्णय घेतना त्याचा भारतावरच उलटा परिणाम होणार नाही? याची दक्षता घेतली पाहिजे असे मत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी मांडले. ते आंबोली येथील ऊस संशोधन केंद्रात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी एखाद्या पर्यटकाला त्याचा धर्म विचारून मारणे हे भयंकर कृत्य असल्याचे सांगितले.

### धार्मिक तेढ वाढेल असे काही घडू नये

अतिरेकानी यापूर्वी देखील हल्ले केले होते. तीन चार घटना घडल्या आहेत, तेव्हा धर्माची चर्चा झाली नव्हती. पण आज धर्माची चर्चा का सुरू आहे? घडलं ते वाईट आहे. देशाला आवाहन आहे धार्मिक आंतर वाढेल असं काही घडू नये.



पवार गुरूवार पासून सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दौऱ्यावर होते. आज, शुक्रवारी त्यांनी आंबोली नांगरतास येथील ऊस संशोधन केंद्राला भेट देऊन संशोधकासोबत बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी बँक संचालक व्हिक्टर डॉन्टस, माजी मंत्री प्रविण भोसले, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष व्ही.बी.पाटील, ऊस सशोधन केंद्राचे प्रमुख अधिकारी प्रभाकर देशमुख उपस्थित होते.

पहलगाम येथील हल्याबाबत पवार यांनी चिंता व्यक्त केली. धर्म विचारून एखाद्या पुरूषाला मारणे म्हणजे परिस्थीतीचे गांभीर्य ओळखले पाहिजे. जे काही लोक धर्माबाबत अधिक बोलतात त्यांनाच सरकार पाठिंबा देते हे योग्य नसल्याचे पवार यांनी म्हटले.

पहलगाममध्ये घडलेल्या घटनेनंतर केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीला आमच्या पक्षाकडून लोकसभेतील नेत्या सुप्रिया सुळे यांना पाठवण्यात आले होते. त्यामुळेच सरकार जो काही निर्णय घेईल त्याला आम्ही पाठिंबा दिला असून सर्वजण सरकार सोबत आहोत. हल्ला भारतावर झालेला आहे त्यामुळेच सरकारला पाठिंबा देणे गरजेचे आहे. पण सरकारने ही पाकिस्तानला सडेतोड उत्तर द्यावे. एखादा निर्णय घेतला तर तडीस न्यावा असे आवाहन पवार यांनी केले.

हल्ल्यानंतर केंद्र सरकारकडून पाकिस्तानवर काही निर्बंध लादण्यात आले आहेत, पण हे निर्बंध लादत असताना सरकारने थोडासा विचार केला पाहिजे. भारताची विमानसेवा जर पाकिस्तानातून जात असताना बंद केली तर त्याचा परिणाम भारतावरच होईल असे अनेक निर्णय आहेत. पण यातून पाकिस्तानला ही एक संदेश जाईल असेही पवार म्हणाले.

पवार म्हणाले, वेंगुर्ले येथील फळ संशोधन केंद्रात काजूवर नवनवीन प्रकिया उद्योग उभे राहत आहेत याची माहिती घेतली हे भूषणावह आहे. असे असे असले तरी काजू पिकांबाबत जनतेत किती उत्साह आहे. हेही तपासून घेतले पाहिजे. पण संशोधनाचे काम चांगले चालले असल्याचे पवार यांनी म्हटले.

शरद पवार म्हणाले की, हिंदू आहेत म्हणून दहशतवाद्यांनी पर्यटकांना गोळ्या घातल्या असं म्हणतात. पण यात काय सत्य आहे याची मला माहिती नाही. पण तिथं जे लोक होते त्यातल्या स्त्रियांना सोडलं आहे. मी एका भगिनीच्या घरी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी सांगितले आम्हा महिलांना हात लावले नाही. त्यांनी फक्त आमच्या पुरुषांना हात लावला.सरकारने हा हल्ला अधिक गांभीर्याने घ्यायला पाहिजे. आम्ही दहशतवाद मोडून काढला असं सरकारच्या वतीने सातत्याने सांगितलं जात होतं. पण घडलेली घटना बघितल्यानंतर कुठे ना कुठे कमतरता आहे हे स्पष्ट आहे. ही कमतरता सरकारने घालवायला हवी. सरकार कमतरता आहे हे मान्य करत असेल तर त्यांनी तातडीने पावले टाकावीत. या कामात आम्हा लोकांचं सहकार्य राहील.

### सरकारने हा हल्ला गांभीर्याने घ्यावा

पहलगाम हल्ल्यानंतर सरकार ज्या काही उपाययोजना करेल त्याला आमचा पाठिंबा असेल असं शरद पवार म्हणाले. ते म्हणाले की, काश्मीरमध्ये जे झालं आहे त्या प्रश्नाकडे सगळ्या देशवासियांनी एका विचाराने सरकार सोबत राहिले पाहिजे. इथं राजकारण आणायचं नाही. अतिरेक्यांनी जो हल्ला केला तो भारताच्या विरोधी आहे. देशाच्या विरुद्ध असं कुणी निर्णय घेते तिथं राजकारण करायचे नसते. त्या दृष्टीने आम्ही लक्ष घातले. सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्यामध्ये आमच्या पक्षाच्या वतीने सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

# कराडमध्ये एका कारने सात वाहनांना उडवले

## थरारक घटना;नागरिक,वाहनधारकांमध्ये भीती,अपघातात सात जण जखमी

**कराड/प्रतिनिधी:-**

शहरानजीकच्या विद्यानगर, कृष्णा कॅनॉल बाजूकडून शहरात जाणाऱ्या ईको कारने सुमारे ३०० मीटर अंतरात सात वाहनांना उडविल्याची थरारक घटना घडली. शुक्रवार (दि. २५) रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. यामध्ये ईको कारसह चार दुचाकी, दोन रिक्षा व एका कारचे मोठे नुकसान झाले आहेत. तसेच अपघातात सहाजण जखमी झाले असून त्यांच्यावर उपजिल्हा रूग्णालय व खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी अपघात प्रकरणी ईको चालक संजय सर्जेराव पवार (वय ६३) रा. शिवाजी हौसिंग सोसायटी, कराड यांना ताब्यात घेतले असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

पान ३ वर



### ईको कारचालक महिला की पुरूष ?

ईको कारच्या थराराची चर्चा शहरात सुरू होती. कृष्णा कॅनॉलपासून रस्त्यात दिसेल त्या वाहनाला धडक देत निघालेल्या ईको कारचा अनेक वाहनचालकांनी पाठलाग केला. अखेर बालाजी हॉस्पिटलजवळ एक रिक्षा, कार व तीन दुचाकींना धडक दिल्यानंतर ईको कार पलटी झाली. यावेळी अपघतग्रस्त वाहनांचे मालक व उपस्थित नागरिकांनी महिला कार चालवत असल्याची माहिती पोलिसांना दिली. मात्र, पोलिसांनी संजय पवार हे कार चालवत असल्याचे सांगितल्याने अपघातग्रस्तांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

# वाईत मोबाईलवर वादग्रस्त स्टेटस ठेवल्या प्रकरणी तरूणाला अटक

**वाई/प्रतिनिधी:-**

पाकिस्तानचा झेंडा आणि भारता विरोधी मजकूर असलेला मोबाईल स्टेटस ठेवल्या प्रकरणी तरूणास वाई पोलिसांनी अटक केली आहे. शुभम दशरथ कांबळे (रा. जांभळी, ता. वाई) असं अटक करण्यात आलेल्या संशयिताचं नाव आहे. याप्रकरणी संकेत सुरेश चिकणे रा.जांभळी ता .वाई सध्या राहणार सोनगिरवाडी, वाई) याने वाई पोलिस ठाण्यात हजर राहून फिर्याद दिली आहे.

संशयित आरोपी शुभम कांबळे याने पाकिस्तानचा झेंडा आणि भारता विरोधी मजकुराचा मोबाईल स्टेटस ठेवला होता. त्याचा मित्र संकेत चिकने याने गुरुवारी (२४ एप्रिल) सायंकाळी तो स्टेटस पाहिला. याप्रकरणी त्याने वाई पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या गंभीर घटनेची तातडीने दखल घेवुन पोलिस निरीक्षक जितेंद्र शहाणे यांनी सखोल चौकशी करून फिर्यादी वरून शुभम कांबळे याच्या विरोधात धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी शहाणे यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले .

पोलिसांच्या प्राथमिक तपासात संशयिताने मोबाईलवर वादग्रस्त स्टेटस ठेवल्याचे आढळून आले त्यांच्या वर लगेचच गुन्हा दाखल केल्या नंतर वाई पोलिसांनी आरोपी शुभम कांबळे याला आज (शुक्रवारी) दुपारी अटक केली. त्याला वाईच्या प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.अशी माहिती वाई पोलिस ठाण्याचे



हवालदार जितेंद्र शिंदे यांनी दिली.

या गुन्हयाचे गांभीर्य पाहून वाईचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र शहाणे हे स्वतः या गंभीर गुन्हयाचा अधिक तपास करत आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट केल्या जात आहेत. त्यातून जातीय आणि धार्मिक भावना दुखावल्या जात असून सामाजिक तेढ निर्माण होत आहे. यामुळं सातारा जिल्हा पोलिस दलाची वादग्रस्त पोस्टरवर करडी नजर आहे. सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा सातारा जिल्हा पोलिसांनी दिला आहे

# महापर्यटन उत्सव अंतर्गत सुरू असलेली कामे मुदतीत पूर्ण करा:पालकमंत्री

**महाबळेश्वर/प्रतिनिधी:-**

महापर्यटन उत्सव महाबळेश्वर आयोजन २ ते ४ मे या कालावधीत करण्यात आले आहे. या अनुषंगाने सुरू असलेली कामे मुदतीत पूर्ण करावीत, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

पालकमंत्री देसाई यांनी महापर्यटन उत्सव महाबळेश्वरच्या अनुषंगाने महाबळेश्वर मध्ये सुरू असलेल्या कामांची व स्थळांची पाहणी केली. याप्रसंगी प्रांताधिकारी राजेंद्र कचरे तहसीलदार तेजस्विनी पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाची उपविभागीय अधिकारी अजय देशपांडे यांच्यासह तालुकास्तरीय विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महापर्यटन उत्सव महाबळेश्वर अंतर्गत मधाचे गाव मांघर व पुस्तकांचे गाव भिलार



या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक जातील या दृष्टीने काम करावे. महापर्यटन उत्सव कालावधीत वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महापर्यटन उत्सवामध्ये स्थानिकांचाही सहभाग घ्यावा अशा सूचना करून पालकमंत्री देसाई म्हणाले, सर्व विभागांनी स्थानिकांच्या मदतीने हा महोत्सव यशस्वी करावा. महाबळेश्वर मध्ये येणाऱ्या कोणत्याही पर्यटकाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. या उत्सवाला जास्तीत जास्त पर्यटक कसे येतील हेही पाहावे. त्याचबरोबर विविध टीव्ही वाहिन्यांवरून महापर्यटन उत्सव महाबळेश्वराची प्रसिद्धी करावी, असे निर्देशही पालकमंत्री देसाई यांनी दिले


# काश्मीरमध्ये अडकलेल्या जिल्ह्यातील सात प्रवाशांचा परतीचा मार्ग सुकर

## आ.डॉ.अतुल भोसलेंकडून तिकिटाची व्यवस्था

**कराड/प्रतिनिधी:-**

काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या आणि अतिरेकी हल्ल्यामुळे तिथेच अडकून पडलेल्या कराड व सातारा येथील ७ पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी कराड दक्षिणचे आ. डॉ. अतुल भोसले पुढे सरसावले आहेत. त्यांनी खा. उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या सातही प्रवाशांच्या विमान व रेल्वे तिकिटांची व्यवस्था केल्याने, हे पर्यटक शनिवारीश्र (दि. २६) रात्री उशिरा कराडमध्ये सुखरुप परतणार आहेत.

कराडमधील इंटेरियर डिझायनर महेश मिलिंद कुलकर्णी हे आपल्या कुटुंबासमवेत काश्मीरला पर्यटनाला गेले होते. त्यांच्यासमवेत



माधवी मिलिंद कुलकर्णी, श्रीधर शामराव क्षीरसागर, वर्षा श्रीधर क्षीरसागर, सुखदा श्रीधर क्षीरसागर हे कराडचे रहिवाशी; तर शरद हरिभाऊ पवार व विद्या शरद

पान ३ वर

# सर्कलवाडी येथे पोलिसाच्या कारने झोपलेल्या व्यक्तीला चिरडले

**सातारा/प्रतिनिधी:-**

कोरेगाव तालुक्यातील सर्कलवाडी येथे ग्रामदेवता श्री जानुबाई देवीच्या यात्रेत छबिण्याचा कार्यक्रम आटोपून घराच्या ओट्यावर झोपलेल्या व्यक्तीला पोलिसाच्या कार ने चिरडले . त्यात त्याचा जागेत मृत्यू झाला .दिनांक २४ रोजी मध्यरात्री सव्वातीन च्या दरम्यान हा अपघात झाला रमेश लक्ष्मण संकपाळ वय ४५ असे मृत्यू झालेले व्यक्तीचे नाव आहे.

संकपाळ यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे गावात तणावाचे वातावरण तयार झाले होते .भुईंज पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला कर्मचारी ज्ञानेश्वर राजे हा मध्यरात्री वाघोली येथे चारचाकी वाहनाने निघाला होता मध्यरात्री सव्वा तीन च्या सुमारास त्याचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार थेट रमेश सपकाळ यांच्या घराच्या ओट्यावर चढली. कारखाली चिरडले गेल्याने रमेश संकपाळ यांचा जागी मृत्यू झाला .राजे याला झोप अनावर झाल्याचे निमित्त होऊन हा अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे अपघाताची माहिती मिळतात सर्कलवाडी ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली पोलीस कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे एका व्यक्तीचा जीव गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे .याप्रकरणी ग्रामस्थांनी वाठार पोलीस ठाण्यामध्ये ठिय्या मांडला ऋतुराज कृष्णा संकपाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कारचालक ज्ञानेश्वर राजे या भुईंज पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

ग्रामस्थ आरोपी पोलीस कर्मचाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी करत आहेत या प्रकरणाचा तपास हवालदार उदयसिंग जाधव करत आहे राजे हे पोलीस दलात असल्याने त्यांना वाचवले जाण्याची शक्यता ग्रामस्थ व्यक्त करत आहे या संदर्भात न्याय न मिळाल्यास प्रसंगी रास्ता रोको करण्याचा इशारा सर्कलवाडी ग्रामस्थांनी दिला आहे.

### अवर्षण..

मुक्त उन्माद मातवे
मनुनिर्मित अवर्षण
मृगजळी आश्वासने
लोभस रे आकर्षण
जल व्यवस्थापनांत
कायमकसले घर्षण
आंदोलनं आधीउभे
सुरु करता सर्वेक्षण
शुष्क राने कवटाळे
नको माती परिक्षण
मना मध्ये किंतू हेतू
चाले आमचे भक्षण
रखवालदार स्वयम्
बोले करा हो रक्षण
सिमापार विचार ना
भोवती घाले कुंपण
नको धो धो पाऊस
आम्हा पुरेसे शिंपण
चेहरा मलीन झाला
स्वच्छ करतो दर्पण
रोगापेक्षा भयावह रे
का वाटते ते लक्षण
प्रगतिला खीळघाले
स्वभावा अव लक्षण
जाहीर होई योजना
विरोध करतो तक्षण
संकटा देई आवतण
स्वताचं करी औक्षण

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कराडमध्ये नागरीवस्तीत डांबराचा टँकर पेटला

## नागरिकांची सतर्कता;नगरपालिकेने दक्षता घेण्याची मागणी

**कराड/प्रतिनिधी:-**

शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून शुक्रवारी डांबरीकरणाचे काम सुरू असताना भाजी मंडई परिसरात डांबराचा टँकर पेटल्याची घटना घडली. वेळीच नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे आग आटोक्यात आली.

याबाबतची माहिती अशी की, कराड शहरांमध्ये नगरपालिकेच्या माध्यमातून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे काम सुरू आहे. शुक्रवार (दि. २५) रोजी सायंकाळी शहरातील भाजी मंडई परिसरात अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण सुरू असताना डांबराच्या टँकरने अचानक पेट घेतला. भाजी मंडईतील भर नागरीवस्तीत रस्त्याचे काम सुरू असताना टँकरने पेट घेतलेल्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या भागात कचऱ्याचे साम्राज्य असून टँकरच्या आगीमुळे लगतच्या



कचऱ्याने पेट घेतला असता, तर मोठी आग भडकली असती. मात्र, परिसरातील नागरिकांनी वेळीच सतर्कता दर्शवत सदरची आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला. परंतु, नगरपालिका प्रशासनाने नागरीवस्तीत अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व अन्य काम करताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# ओगलेवाडीतील जनता दरबारात ३०० प्रश्न निकालात

## आ.मनोज घोरपडे यांनी २२ शासकीय विभागातील समस्या सोडविल्या

**कराड/प्रतिनिधी:-**

आ. मनोज घोरपडे यांनी शुक्रवारी ओगलेवाडी (ता. कराड) येथे घेतलेल्या जनता दरबाराला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला. यामध्ये ५८३ नागरिकांनी आपापल्या विविध विभागातील समस्या आ. मनोज घोरपडे व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या समोर मांडल्या. यावेळी ३०० हून अधिक नागरिकांच्या समस्या आ. घोरपडे यांनी जागेवरच सोडवल्या.

प्रारंभी, पेहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटक नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात



आली. यावेळी महसूल, भूमी अभिलेख, प्रांत विभाग, सार्वजनिक बांधकाम, एसटी महामंडळ, एमएससीबी, मदत व पुनर्वसन, पोलीस अधिकारी, ग्रामविकास, जलसंपदा, आरोग्य, एकात्मिक बालविकास, वनविभाग, शालेय शिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, पशुसंवर्धन, फेरफार, अदालत व कोषागार विभाग यांसारख्या २२ शासकीय विभागातील समस्या सोडविण्यात यश आले.

यावेळी आ. मनोज घोरपडे, तहसीलदार कल्पना ढवळे, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, गट शिक्षणाधिकारी बिपिन मोरे, कृषी अधिकारी, नायब तहसीलदार राठोड, उपनिबंधक यादव मॅडम यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शिधापत्रिका वाटप करण्यात आले. तसेच स्व. गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना दोन लाख रुपये मंजुरीपत्र देण्यात आले. यावेळी बापूराव धोकटे, विजय कदम, नवनाथ पाटील, विनायक भोसले, अमोल पवार, शिवाजी डुबल आदी उपस्थित होते.

### चार मंडलातील हजारो नागरिकांची उपस्थिती

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील चार मंडलातील विविध गावचे नागरिक व महिला आपापल्या समस्या घेऊन आ. मनोज घोरपडे यांच्या जनता दरबारात आले होते. यावेळी आ. घोरपडे यांनी जागेवरच अनेक प्रकरणांचा निपटारा केला. तसेच अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष नागरिकांना न्याय देण्याच्या सूचना केल्या.

# किरण भगतने विक्रांत कुमारला केले चीतपट

## श्री नाथाष्टमीनिमित्त कुस्ती मैदानात दीडशेहून अधिक चटकदार कुस्त्या

**विटा/प्रतिनिधी:-**
विटयाचे ग्रामदैवत श्री भैरवनाथाच्या श्री नाथाष्टमी उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कुस्ती मैदानात एकेरी कस डावावर पै. किरण भगत याने विक्रांत कुमारला आस्मान दाखवले. द्वितीय क्रमांकाच्या लढतीत संदीप मोटे विरुद्ध महारुद्र काळेल यांच्यातील कुस्ती निकाली न झाल्याने बरोबरीत सोडविण्यात आली. तृतीय क्रमांकाच्या लढतीत अभिजीत मोरे याने अनुज चौधरी याला चितपट केले. चौथ्या क्रमांकाच्या लढतीत सागर तामखडे विरुद्ध सुरेश ठाकूर यांच्यातील कुस्ती निकाली न झाल्याने बरोबरीत सोडवण्यात आली. प्रमुख लढतींबरोबरच या मैदानात दीडशेहून अधिक चटकदार कुस्त्या झाल्या. कुस्त्या पाहण्यासाठी हजारो कुस्तीशौकीन उपस्थित होते.

नाथाष्टमीनिमित्त आयोजित करण्यात येणार्या कुस्ती मैदानाला मोठी परंपरा आहे. निकाली कुस्त्यांची मोठे मैदान म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. अनेक मल्लांनी या मैदानातूनच आपल्या कुस्तीचा श्रीगणेश केला आहे.


विटा येथे आयोजित कुस्ती मैदानात प्रथम क्रमांकाची पै. किरण भगत विरुद्ध विक्रांत कुमार यांच्यातील कुस्ती जोडताना धनंजय फडतरे, अँड. सदाशिवराव पाटील, अँड. वैभव पाटील व अन्य. (छायाचित्र : संजय चव्हाण, कडेपूरकर)

सालाबादप्रमाणे श्री नाथाष्टमी उत्सवानिमित्त तालुका क्रीडा संकुलाजवळील आखाड्यात कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. नाथाष्टमीनिमित्त तालुका क्रीडा संकुलाजवळील आखाड्यात कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. मैदानाचे उदघाटन माजी आमदार अँड. सदाशिवराव पाटील यांच्या हस्ते झाले. मैदानात पंच म्हणून राहुल रूपनर, प्रा. सुर्यकांत शिंदे, विकास पाटील, प्रा. सूर्यकांत शिंदे, मेहबूब शेख, हणमंतराव तामखडे यांनी काम पाहिले.

यावेळी माजी आमदार अँड. सदाशिवराव पाटील, माजी नगराध्यक्ष अँड. वैभव पाटील, विराज दूध संघाचे चेअरमन विशाल पाटील, विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे, माजी उपनगराध्यक्ष किरण तारळेकर, दहावीर शितोळे, सुभाष भिंगारदेवे, माजी नगरसेवक सचिन शितोळे, पृथ्वीराज पाटील, पद्मसिंह पाटील, प्रशांत कांबळे, आप्पा पाटील, एकनाथ गडदरे, रवींद्र कदम, सुभाष भिंगारदेवे, विनोद पाटील, विपुल तारळेकर, पांडुरंग पवार, गजानन कदम, कैलास भिंगारदेवे यांच्यासह कुस्तीशौकीन उपस्थित होते. सुत्रसंचालन सुरेश गवळी यांनी केले.

# इस्लामपूरात राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने

## दहशतवाद्यांच्या पहलगामात भ्याड हल्ल्याचा निषेध

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**
इस्लामपूर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने इस्लामपूर येथील ऐतिहासिक कचेरी चौकात पहलगाम येथील दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. केंद्र सरकारने केवळ बोलचाच भात आणि बोलाचीच कढी असे करू नये. त्यांनी तातडीने कठोर पाऊले उचलून दहशतवाद्यांना नेस्तनाबूत करावे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

शहराध्यक्ष शहाजी पाटील, प्रा.शामराव पाटील, माजी नगरसेवक खंडेराव जाधव, संचालक शैलेश पाटील, माजी नगराध्यक्ष मुनीर पटवेकर, सुभाषराव सुर्यवंशी, माजी उपनगराध्यक्ष शंकरराव चव्हाण,महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात, माजी शहराध्यक्षा रोझा किणीकर, प्रदेश सदस्या कमल पाटील, युवक शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, सरचिटणीस अभिजित रासकर प्रामुख्याने उपस्थित होते. शहाजी पाटील म्हणाले, २६/११ च्या हल्ल्यानंतर महाविकास आघाडीच्या सरकारने पाकिस्तानला जगासमोर उघडे पाडले, तसे केंद्र सरकारने यावेळीही करावे.

खंडेराव जाधव म्हणाले, केंद्र सरकारला देश आणि सामान्य माणसाचे काही देणे-घेणे नाही. हिंदू-मुस्लिम वादावर राजकीय पोळी भाजण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. एक भारतीय म्हणून दहशतवाद्यांना तीव्र विरोध करायला हवा. मुनीर पटवेकर म्हणाले, काश्मीर हे जागतिक पर्यटन स्थळ आहे. मग तिथे चोख बंदोबस्त देण्याची केंद्राची जबाबदारी नव्हती काय? देशाचे गुप्तचर खाते काय करीत होते? रोझा किणीकर म्हणाल्या, स्थानिक नागरिकांनी पर्यटकांना मदत केली आहे. सैन्य कमी करण्याचा निर्णय कोणी घेतला? कमल पाटील म्हणाल्या,आम्ही नुकतेच तिथे जाऊन आलो. पर्यटन हेच तेथील अर्थकारणाचा स्रोत आहे. अशा घटनांनी स्थानिकांचा रोजी-रोटीचा प्रश्न निर्माण होईल. यावेळी पुष्पलता खरात,शैलेश पाटील,दिग्विजय पाटील,अभिजित रासकर, डॉक्टर सेलचे डॉ.अमित सुर्यवंशी यांनीही तीव्र शब्दात या घटनेचा निषेध केला. विलासराव ताटे, अनिल पावणे, राजेश पाटील, उषा मोरे-पंडीत, मालन वाकळे, योगिता माळी, सचिन कोळी, अभिजित कुर्लेकर, अभिमन्यू क्षीरसागर, बाळासो कोळेकर, रतन रायगांधी, भूषण शहा, शकील जमादार, मुबारक मुजावर, मोहन भिंगार्डे, सुहास हांडे, प्रकाश पाटील, रोहन देसाई, धीरज भोसले, वैभव भोसले यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते या निषेध सभेत सहभागी आले होते.




इस्लामपूर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पहलगाम येथील भ्याड हल्ल्याचा निषेध करताना शहराध्यक्ष शहाजी पाटील, खंडेराव जाधव, शंकरराव चव्हाण, मुनीर पटवेकर, शैलेश पाटील, पुष्पलता खरात, कमल पाटील, रोझा किणीकर, दिग्विजय पाटील, तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते.

# आरोग्यसंपन्न विद्यार्थी घडवण्यासाठी 'मळाईदेवी'चा पुढाकार

## वासंतिक क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन; संस्काराची शिदोरी उपयोगी : शेख

**कराड/प्रतिनिधी : -**
श्री मळाईदेवी शिक्षण संस्था, मलकापूर संचलित आनंदराव चव्हाण विद्यालय व आदर्श प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबिर २०२५ चा शुभारंभ नुकताच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेतर्फे विद्यार्थ्यांसाठी वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. त्यानुसार वासंतिक क्रीडा प्रशिक्षणाच्या माध्यमातून आरोग्यसंपन्न विद्यार्थी घडवण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला असून विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्याचे कौतुकास्पद कार्य या संस्थेच्या माध्यमातून होत आहे. संस्थेच्या या उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी क्रीडा प्रशिक्षणाविषयी डॉ. नवनाथ तुपे व प्रशिक्षक अल्लाबक्ष पटेल यांनी मनोगतात विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी हॉलीबॉलमध्ये सुवर्णपदक प्राप्त खेळाडू मनीषा राठोड हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कराडचे पोलीस उपनिरीक्षक अजरुद्दीन शेख होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना शालेय जीवनातील संस्काराची शिदोरी जीवनामध्ये नेहमी उपयोगी कशी पडते, याची विविध उदाहरणे दिली. तसेच यासाठीच श्री मळाईदेवी शिक्षण संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांना दर्जेदार क्रीडा प्रशिक्षणासोबत पौष्टिक नाष्टाही दिला जातो, याचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमासाठी श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकराव थोरात, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कुंभार, उपमुख्याध्यापक ए.बी. थोरात, पर्यवेक्षक बी.जी. बुरुंगले, आदर्श ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख सौ. शिला पाटील, पोलीस कॉन्स्टेबल संभाजी जाधव, विद्यार्थी, सर्व शिक्षक, पालक उपस्थित होते.

विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जे. एन. कराळे, सौ.एस.टी. कांबळे, डी.एस. शिंदे, सौ.एम.एम. लिंबारे, सौ. उर्मिला थोरात, सौ. सविता पाटील, आर.ए. माने, राजेंद्र पांढरपट्टे, शरद तांबवेकर यांनी शिबिराचे नियोजन केले.

क्रीडा शिबीरासाठी अल्लाबक्ष पटेल, गौरी सिंग, उज्वला रैनाक, संजय गरुड, प्रियांका पानवल, राहुल विरकर, सोपान इनामदार, संजय राठोड, हेमंत शिर्के, राहुल परिहार, सारंग थोरात, गजानन कुसुरकर, श्रीहरी यादव, प्रशांत गुजर यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद तांबवेकर, सौ. ज्योती शिंदे यांनी आभार मानले.

# रविवारी लेंगरेत निसर्ग फाउंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

## पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा व जेष्ठ अभिनेते माधव अभ्यंकर यांची प्रमुख उपस्थिती

**विटा/प्रतिनिधी:-**
खानापूर तालुक्यातील लेंगरे येथे निसर्ग फाउंडेशनच्यावतीने आमदार सुहास बाबर, अमोल बाबर, प्रा.संजय ठिगळे यांचा नागरी सत्कार व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रविवारी २७ एप्रिल रोजी संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा व जेष्ठ अभिनेते माधव अभ्यंकर यांच्यासह नामवंत मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात ११ व्यक्तींचा व ३ स्वयंसेवी संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड बाबासाहेब मुळीक तर स्वागताध्यक्षपदी माजी आदर्श जिल्हा परिषद सदस्य व सहकार्यवाह फिरोज शेख असून कार्यक्रमास पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा, जेष्ठ अभिनेते माधव अभ्यंकर,माजी जिल्हा परिषद सदस्य सुहास शिंदे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख संजय विभुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ विक्रमसिंह कदम, ड संदीप मुळीक, संजय गांधी निराधार योजना खानापूर तालुका अध्यक्षा सौ. शितल बाबर, जीवनप्रबोधनी महाविद्यालयाच्या कार्यवाह सौ सोनिया बाबर, माजी सभापती सौ. मनिषा बागल, निसर्ग सखी मंच अध्यक्षा डॉ वैशाली हजारे, सरपंच सौ. लक्ष्मीबाई पाटील, उपसरपंच झाकीर पठाण यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्यस्तरीय रेकॉर्ड डान्स स्पर्धा आयोजित करण्यात आली असून महाराष्ट्रातील दिग्गज कलाकाराची उपस्थिती राहणार आहे.

# जलव्यवस्थापन कृती पंधरवडा अंतर्गत शेतकरी संवाद उपक्रम

**पुसेगाव/प्रतिनिधी:**
सध्या महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागा अंतर्गत जल व्यवस्थापन कृती पंधरवडा हा उपक्रम सुरू आहे. या उपक्रमा अंतर्गत जलसंपदा विभागाच्या जिहे काटापुर उपसा सिंचन विभागाचा अंतर्गत खटाव तालुक्यातील नेर धरणातलगत असलेल्या शेतकर्‍यांसोबत शेतकरी संवाद या कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आहे.

या शेतकरी संवाद कार्यक्रमांतर्गत गुरुवर्य कै लक्ष्मण रावजी इनामदार उपसा सिंचन योजना ( जिहे कटापूर) अंतर्गत धरणाच्या डाव्या तीरावर्ती असलेले नेहरू उपसा सिंचन योजना क्रमांक दोन च्या लाभ क्षेत्रातील शेतकर्‍यांसोबत संवाद साधण्यात आला,

या योजनेअंतर्गत खटाव तालुक्यातील नेर, पुसेगाव, ललगुण, राजापूर वेरणे, उंबरमळे, निढळ. कडगुण या नऊ गावांमधील एकूण ३००० हे. क्षेत्रासाठी सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. या योजनेअंतर्गत निर्धारणातून पाणी उपसा करून या ९ गावातील क्षेत्रासाठी बंदिस्त नलिका वितरण प्रणाली द्वारे पाणी सिंचनासाठी पुरवले जाणार आहे. त्यासाठी या योजनेअंतर्गत दोन मुख्य नलिका म्हणून एक नलिका गावाकडे जात आह तसेच या मुख्य नलिका वरती असलेले वितरण प्रणाली (वितरिका) हारे सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.



तसेच नेर उपसा सिंचन योजना क्रमांक २ अंतर्गत पंपगृह कळयंत्र आवार, कंट्रोल रूम, इंटेक्स स्ट्रक्चर, उधवगामी नलिका रांग, वितरण कुंड इ. बांधकामाचा समावेश असून सध्या स्थितीतील हे बांधकाम जवळपास ९९% पूर्ण झाले आहे.

शेतकरी संवाद या कार्यक्रमांतर्गत वरील ९ गावातील उपस्थिती शेतकर्‍यांशी योजनेच्या कामाबाबत व योजनेतून उपलब्ध होणाऱ्या सिंचनाच्या सोयी सुविधा बाबत संवाद साधण्यात आला. शेतकर्‍यांनी योजनेच्या कामाबाबत समाधान व्यक्त व आमदार महेश शिंदे साहेब व जलसिंचन विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार माणले. तसेच जलसंपदा विभागामार्फत उर्वरित कामही लवकर पूर्ण करून या योजनेअंतर्गत असलेल्या ९ गावांना लवकरच योजना कार्यान्वित करून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजित असल्याचे सांगण्यात आले.

# गुरुकुल स्कूलच्या 'वाचाल तर वाचाल' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## सहभागी विद्यार्थ्यांना फीमध्ये ३ टक्के सवलत

**सातारा/प्रतिनिधी:**
गोडोली शाहूनगर येथील गुरूकुल एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यम गुरूकुल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमाबरोबरच सांस्कृतिक, सामाजिक, कला, क्रीडा,विज्ञान, खेळ यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येतात.

याच अनुषंगाने गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी 'वाचाल तर वाचाल' हा वाचानपर्व उपक्रम मंगळवार, दिनांक १५-०४-२०२५ पासून सुरु झालेला हा उपक्रम दिवाळी सुट्टीपर्यंत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्कूलच्यावतीने प्रोस्ताहन म्हणून वार्षिक फी मध्ये ३% सवलत देण्यात निर्णय संस्थेच्या व्यवस्थापनाने घेतलेला आहे.

विद्यार्थ्यांच्यात वाचनाची सवय व आवड वाढीस लागण्यासाठी, मोबाईल, गेमिंग, चॅटींग सोशल मिडियापासून दूर राहण्यासाठी, विविध विषयांमध्ये आवड वाढीस लागण्यासाठी, कुतूहल, सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, शिस्त, मुल्ये, जीवनकौशल्ये, नेतृत्व भावना विकसित होण्यासाठी, शाळेच्या ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या १०,००० पेक्षा जास्त मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील पुस्तकांचा खजिना इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये स्क्रीनच्या माऱ्यावर पुस्तकांची मात्रा ठरणारा हा उपक्रम ठरेल.

या योजनेविषयी महिती देताना गुरुकुल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे म्हणाले की, उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल मिडिया पासून दूर रहावे व पुस्तकांना जवळ करावे तसेच जे विद्यार्थी या उपक्रमात सातत्य ठेवतील अशा विद्यार्थ्यांची माहिती स्वतंत्र ठेवण्यात येणार असून त्या अधिक वाचानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी फी मध्ये ३% सवलत देण्यात येणार असून याशिवाय, सदर विद्यार्थ्यांना विशेष सहभाग प्रमाणपत्र मिळेल व वार्षिक स्नेहसंमेलनात त्यांचा सन्मान केला जाईल. या सवलतीमुळे विद्यार्थ्यांना अधिक पुस्तके वाचण्याची प्रेरणा मिळेल.



या उपक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी गुरुकुल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे, सचिव आनंद गुरव, अॅड. ऐश्वर्या चोरगे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शीला वेल्हाळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुराधा कदम, माध्यमिक विभागाच्या उपमुख्याध्यापिका सोनाली तांबोळी, जनसंपर्क अधिकारी विश्वनाथ फरांदे, ग्रंथपाल राजेश निकम, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक - शिक्षक संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# अशोक सुर्यवंशी यांचे निधन

**वाई/प्रतिनिधी:**
महाराष्ट्र राज्य नाभिक संघटनेचे सातारा जिल्ह्याचे माजी उपाध्यक्ष, शिवसेना माजी वाई तालुका प्रमुख अशोक ज्ञानेश्वर सुर्यवंशी वय ७४ यांचे पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. ते दादा या नावाने ओळखले जात.वाई तालुका वीर जीवा महाले नाभिक संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. त्यांचे पश्चात पत्नी,दोन विवाहित मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांचेवर रविवार पेठ वाईच्या स्मशानभूमीत मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



# काश्मीरमध्ये अडकलेल्या...

पान १ वरुन
पवार हे साताराचे दोघे पर्यटक होते. पहेलगाम येथे अतिरेक्यांनी जेव्हा भ्याड हल्ला केला तेव्हा हे पर्यटक गुलमर्गमध्ये होते. त्यानंतर ते तातडीने श्रीनगरमध्ये निवासाच्या ठिकाणी पोहचले. दरम्यान, या अतिरेकी हल्ल्यामुळे सर्वत्रच घबराटीचे वातावरण पसरल्याने पर्यटकांनी पुन्हा आपापल्या गावी जाण्यासाठी हालचाल सुरु केली.

कराड व सातारा येथील हे पर्यटक श्रीनगरमध्ये अडकल्याचे समजताच आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी बुधवार (दि. २३) त्यांच्याशी फोनवरुन प्रत्यक्ष संपर्क साधला. यावेळी त्यांना आणण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय उड्डाण वाहतूकमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी चर्चा करत, तिकिटांची व्यवस्था करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे या सर्व पर्यटकांना दिलासा मिळाला.

या पर्यटकांना लवकरात लवकर कराडला सुखरुप आणण्यासाठी आ. डॉ. भोसले यांनी सर्व पातळ्यांवर आपले प्रयत्न सुरु ठेवले. आ. डॉ. भोसले यांनी गुरुवार (दि. २४) सायंकाळी खा. उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या सातही प्रवाशांसाठी श्रीनगर ते दिल्ली विमान प्रवास आणि दिल्ली ते कराड असे रेल्वे प्रवासाच्या तिकिटांची व्यवस्था केली. आज शुक्रवार (दि. २५) श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन इंडिगो एअरलाईन्सच्या विमानाने हे सातही पर्यटक दुपारी दीडच्या सुमारास दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुखरुप पोहचले. तिथून पुढे दर्शन एक्सप्रेसने हे सर्व पर्यटक शनिवारी (दि. २६) रात्री उशिरा कराड येथे पोहचणार आहेत

# कराडमध्ये एका कारने सात ...

पान १ वरुन
याबाबत घटनास्थळ व पोलिसांनी मिळालेली माहिती अशी की, शुक्रवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास संजय पवार व त्यांच्या पत्नी सुषमा पवार त्यांच्या ईको कारने कृष्णा कॅनॉल बाजूकडून कराड शहरात येत होते. कॅनॉलच्या पुढच्या बाजूला ईको कारने प्रथम रिक्षाला धडक दिली. यानंतर एका दुचाकीला धडक दिली. कृष्णा पुलावरून शहरात आल्यावर ईको कारने बालाजी हॉस्पिटलजवळ एका मांझा कारला जोराची धडक दिली. या

मांझा कारजवळ पार्क केलेल्या एका दुचाकीलाही धडक देऊन ईको कारने बालाजी हॉस्पिटलसमोर उभा असलेल्या रिक्षा व दोन दुचाकींनाही धडक दिली. यामध्ये दुचाकीवर रिक्षा पलटी झाली. तसेच या रिक्षावर ईको कारही पलटी झाली. कारच्या धडकेने बालाजी हॉस्पिटलजवळ असलेले एक झाड उन्मळून पडले आहे.

यावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी पलटी झालेली कार सरळ करून त्यातील महिला व नागरिकाला बाहेर काढून बालाजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. दरम्यान, कृष्णा कॅनॉलपासून रस्त्यात दिसेल त्या वाहनाला धडक देत कराड शहरात आलेल्या ईको कारमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. बालाजी हॉस्पिटलसमोरील परिसरात ईको कारसह मांझा व तीन अपघातग्रस्त दुचाकी पडल्या होत्या. वाहनांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे काहीकाळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

# दाम्पत्याला मारहाण करणाऱ्या आठ जणांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**
अतीत, ता. सातारा येथील पती, पत्नी व मुलास मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांवर बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दि. २१ रोजी हा प्रकार घडला. बोरगाव पोलीस ठाण्यात सतीश बापू कांबळे (वय ५२, रा. अतीत) यांनी फिर्याद दिली असून, मंजुषा काळे, चिंतामणी काळे, अनिकेत चिंतामणी काळे, सौरभ प्रकाश काळे, प्रसन्न सुरेश कांबळे, सनी चव्हाण, शुभम चव्हाण, प्रतीक कांबळे (सर्व रा. अतीत) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# राजेवाडी तलाव प्रश्नी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी घेतली दखल

## आ. सदाभाऊ खोत यांच्या पत्रावरून दिला आदेश

**आटपाडी/प्रतिनधी:**
राजेवाडी तलावाच्या अनुषंगाने १४० वर्षापासून आटपाडी तालुक्यावर झालेल्या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री, आमदार सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रावरून मुख्यमंत्री महोदयांनी, जलसंपदा विभागाचे राज्याचे अप्पर मुख्य सचिवांना तपासून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

आटपाडीचे ज्येष्ट पत्रकार, शेतकरी साहित्य इर्जिक परिषदेचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिकभाई खाटीक यांनी राजेवाडी तलाव प्रश्नी, आमदार सदाभाऊ खोत यांच्यासह राज्यातील अनेक आमदार, खासदार महोदयांचे लक्ष वेधले होते .

आमदार सदाभाऊ खोत यांनी दि.२३ एप्रील रोजी, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना भेटून दिलेल्या पत्रात, १८७६ साली उभारलेला ३ टीएमसी क्षमतेचा हा म्हसवड तलाव (म्हसवड ता.माण जि. सातारा), सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याच्या ज्या राजेवाडी गावात उभा आहे, ते राजेवाडी गाव, नावापासून आणि बहुतांश आटपाडी तालुका १४० वर्षापासून पाण्याअभावी वंचित आहे. हे मोठे दुर्दैव आहे .



म्हसवड मध्यम प्रकल्पाचे नाव शासन दरबारी राजेवाडी तलाव असे केले जावे. फलटण (सातारा) येथील या तलावाचे मुख्य व्यवस्थापन, सांगली जिल्हा जलसंपदाकडे दिले जावे. पंढरपूर (सोलापूर) येथील उपविभागीय कार्यालय, आटपाडी (सांगली) येथे सुरु केले जावे. महुद (सांगोला, सोलापूर) येथील शाखा कार्यालया बरोबर राजेवाडी (आटपाडी) येथेही शाखा कार्यालय व्हावे .

राजेवाडी तलावाला नवा कॅनॉल काढून या कॅनॉलला आटपाडी तालुक्यातील सर्व तलाव जोडले जावेत. उरमोडी अथवा निरेच्या पाण्याने राजेवाडी तलाव बारमाही करावा.

या लक्षवेधी न्याय मागण्यांच्या अनुषंगाने राज्य शासनाने योग्य तो निर्णय सत्वर करावा. अशी विनंती केली आहे. या पत्रावरच मुख्यमंत्री महोदयांकडून आदेश दिले गेले आहेत.

राजेवाडी प्रश्नी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खा. सुप्रियाताई सुळे बारामती, खा.विशालदादा पाटील सांगली, खा.अमोल कोल्हे शिरूर पुणे, खा.अमर काळे वर्धा, माजी मंत्री, खा . फौजिया खान राज्यसभा सदस्य, परभणी, हे ५ खासदार महोदयांनी तसेच माजी मंत्री, आमदार सुरेशभाऊ खाडे मिरज, आ.धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ सांगली, आ.सुहास बाबर खानापूर, आ. गोपीचंद पडळकर जत, आ.रोहीत आर.आर.आबा पाटील तासगांव - कवठेमहंकाळ, माजी मंत्री, आ. विश्वजीत कदम पलुस कडेगांव, आ. इद्रिस नायकवडी मिरज, आ. उत्तमराव जानकर माळशिरस, आ.जयंत आसगांवकर कोल्हापूर, आ. बापूसाहेब पठारे वडगांव -शेरी पुणे, आ.अभिजित पाटील माढा या ११ विद्यमान लोकप्रतिनिधीं सह एबीपी माझा मराठी न्युज चॅनेल मुंबईचे मुख्य संपादक राजीव खांडेकर, श्रमिक मुक्ती दलाचे प्रणेते डॉ.भारत पाटणकर कासेगांव, माजी आमदार राजेंद्रआण्णा देशमुख खानापूर -आटपाडी, जि. प.माजी अध्यक्ष अमरसिंहबापू देशमुख आटपाडी, दै.जनप्रवासचे संपादक संजय भोकरे सांगली, इत्यादी मान्यवरांनी राजेवाडी प्रश्नी समर्थन दिले असून मुख्यमंत्री महोदयांना खास पत्रे ही पाठविली आहेत.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

### नशिबाची परीक्षा

शनिवार २६ एप्रिल २०२५

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ७-३-५ मजबुत |
|---|---|---|---|
| 179 278 377 | 7 - 4 | 149 248 220 | जोड 76-14-30-52-49 |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | | सिंगल ०-२-३ मजबुत |
|---|---|---|---|
| 190 280 550 | 0 - 1 | 137 128 119 | जोड 07-51-26-39-18 |

**मुंबैम (मेन )**

| उदय-अस्त | सिंगल ----- मजबुत |
|---|---|
| सुट्टी | जोड |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

## आज का अंदाज

शनिवार दिनांक २६ एप्रिल २०२५

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ० - १ - ४ - ७ | ३ - ५ - ६ - ९ |
| ३७०-११९-६९९-३५९ | १३९-६९०-३६७-२३४ |
| ५७८-३९९-७७०-१२४ | २३८-७८०-४६६-३७९ |
| ४६०-५८८-४००-२५० | ३३७-५००-५५६-४७८ |
| जोडी | जोडी |
| ०२ - १२ - ४६ - ७६ | ३१ - ५१ - ६२ - ९२ |
| ०५ - १५ - ४३ - ७३ | ३० - ५० - ६७ - ९७ |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३८ - ५८ - ६४ - ९४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २६-२८ एप्रिल
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

शनिवार दिनांक २६ एप्रिल २०२५

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | २१ | ५१ | ६० | ९० |
| | २७ | ५७ | ६७ | ९४ |
| | २३ | ५३ | ६८ | ९८ |
| | ६७९ | २३० | १६९ | २३४ |
| | ११० | ३५७ | ३४८ | ४७८ |
| | २२८ | ४४७ | २४० | ३६० |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# शिरगावच्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नाम फाऊंडेशन व टाटा मोटर्सने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद

## ना. मकरंद पाटील



**वाई/प्रतिनिधी:** शिरगाव ता.वाई येथे टाटा मोटर्स आणी नाम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिरगाव ता .वाई येथील तालाव क्र . १ मधील गाळ काढण्याचा शुभारंभ मकरंद आबा पाटील मंत्री मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य वाईच्या तहसीलदार सोनाली मेटकरी वाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजयकुमार परिट सरपंच दैवता भोसले यांच्या हस्ते मशिनरींचे श्रीफळ वाढवून पुजन करुन कामाला सुरुवात करण्यात आली .

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मंत्री मकरंद आबा पाटील म्हणाले कि वरुण राज्याच्या लहरी स्वभावा मुळे राज्यातील अनेक भागातील गावोगावचे पाझर तालाव गावांना पिण्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायतींच्या विहिरी पुर्णपणे कोरड्या पडल्या आहेत त्यामुळे दुर्दैवाने गावोगावच्या ग्रामस्थांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे .या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सरकारला टेंकरसाठी करोडो रुपये खर्च करून टंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे . राज्यातील एकही गाव पाण्या पासून वंचित राहु नये याची खबरदारी घेण्यासाठी सरकारने प्रत्येक तालुक्यातील प्रांताधिकारी तहसीलदार पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी आणी पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता शाखा अभियंता विशेष आदेश काढुन सक्त सुचनाही दिल्या आहेत . त्यामुळे पाणी टंचाई ग्रस्त गावातील ग्रामस्थांनी टेंकरची मागणी केल्यास त्यांना तातडीने पाणी पुरवठा केला जाईल असा विश्वास यावेळी बोलताना मंत्री मदत व पुनर्वसन नामदार मकरंद आबा पाटील यांनी शिरगाव ता.वाई येथे बोलताना दिला . माझ्या मतदारसंघांतील वाई खंडाळा महाबळेश्वर या तिन्ही तालुक्यातील जि गावे पाणी टंचाईग्रस्त आहेत अशा गावांमधील ग्रामस्थांनी टेंकरची मागणी केल्यास त्यांना तातडीने टेंकरने पाणी पुरवठा करण्याच्या बरोबरच कुठलेही गाव पाण्यापासून वंचित राहु नये याची खबरदारी घेण्यासाठीच्या सुचनाही मि दिल्या आहेत .

> राज्यातील गावांनवर आलेले पाणी टंचाईच्या संकटावर यशस्वी पणे मात करण्यासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून सिने अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांनी स्थापन केलेली नाम फाऊंडेशन या संस्थे मार्फत राज्यातील गावात असणारे पाझर तलावातील गाळ स्वखर्चाने मोफत गाळ काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.त्या मुळे तालावात पाणी साठा मुबलक होणार आहे. या वर्षा पासून टाटा मोटर्स ही कंपनी देखील देखील या मदत कार्यात सहभागी झाली आहे. त्यांनी हा जनहितासाठी सुरू केलेला उपक्रम नक्कीच कौतुकास्पद आहे असे गौरव ऊदगार ना.मकरंद पाटील मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी काढले.

# उबाठा शिवसेना गटाचे शिवतीर्थावर निषेध आंदोलन

## पाकिस्तानच्या नापाक कारवायांच्या विरोधात घोषणाबाजी



**सातारा/प्रतिनिधी:** उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या वतीने शिवसेना नेत्या छायाताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी पोवई नाका येथे पाकिस्तानने पहलगाम येथे केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ जोरदार आंदोलन करण्यात आले यावेळी शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत पाकच्या ध्वजाची होळी केली तसेचअतिरेक्यांना कठोर शासन करा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यासंदर्भात छायाताई शिंदे बोलताना म्हणाल्या पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख उपनेते नितीनजी बानुगडे पाटील, पश्चिम महाराष्ट्र समन्वयक माजी आमदार दगडूदादा सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जम्मू काश्मीर पेहलगाम येथील पर्यटनासाठी गेलेल्या निष्पाप नागरीकांवर झालेल्या हल्ल्यातील भारतीय पर्यटक नागरिकांना श्रद्धांजली आणि पाकिस्तानचा निषेध करण्याकरता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवतीर्थ पोवई नाका सातारा येथे निषेध आंदोलन करण्यात आले आहे .

याठिकाणी शिवसैनिकांनी पाकिस्तानच्या विरोधात घोषणा देत केंद्र सरकारने ठोस कारवाई करावी आणि दहशतवादाचा समूळ नायनाट करावा ही मागणी करण्यात आली. जम्मू काश्मीर पहेलगाम येथील हल्ला ये केंद्र सरकारच्या गुप्तचर यंत्रणांच अपयश आहे असेही या ठिकाणी ठासून सांगण्यात आले .उपनेत्या छायाताई शिंदे उपजिल्हाप्रमुख विश्वनाथ धनावडे त्याचप्रमाणे गणेश अहिवळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते आंदोलनामध्ये शिवसेना उपनेत्या सौ छायाताई शिंदे सातारा जिल्हासंघटिका सौ अमृताताई पाटील उपजिल्हाप्रमुख श्री विश्वनाथ धनावडे, निमिष शहा आरोग्य सेना,तालुका संघटिका संगीता जाधव, शहरसंघटक प्रणव सावंत, तालुका प्रमुख रमेश बोराटे, संतोष चव्हाण, सुनील पवार, सातारा शहर प्रमुख रवींद्र भणगे, शिवराज टोणपे, माजी शहरप्रमुख बाळासाहेब शिंदे, युवासेना उपजिल्हाप्रमुख सागर धोत्रे, शिवेंद्र ताटे,शहर आरोग्यसेना सुमित नाईक, उपसंघटक सादिक बागवान उपतालुकाप्रमुख अक्षय धोंडे, उपशहर प्रमुख गणेश अहिवळे, माजी तालुकाप्रमुख अनिल गुजर, श्रीकांत पवार, मंगेश जाधव, अशितोष पारंगे,अक्षय जाधव, प्रशांत इंगळे, रामचंद्र साळुंखे, जानुजी साळुंखे आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते प्रसंगी शिवसैनिकांनी पाकिस्तान मुर्दाबाद... नीम का पत्ता कडवा है पाकिस्तान भडवा है...जला दो जला दो पाकिस्तान जला दो...मिटा दो मिटा दो पाकिस्तान मिटा दो मुर्दाबाद मुर्दाबाद पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा दिल्या आणि पोवई नाक्यावरील परिसर दानानून सोडला.

# खानापूरात महादेव मंदिरात नंदीची विटंबना

## विटा –खानापूर पोलिसांचा फौज फाटा तैनात ; खानापूर कडकडीत बंद

**विटा/प्रतिनिधी:** खानापूर तालुक्यातील खानापूर येथील पापनाशिनी ओढ्याच्या काठावरील प्राचीन महादेव मंदीरामध्ये श्री शिवशंभू महादेवांची पिंड आहे. या पिंडीसमोर काही अंतरावर दगडी नंदी वसवला आहे. या दगडी नंदीची अज्ञात समाजकंटकांनी शिंगे तोडून एका पांढर्या कापडाने नंदी बांधलेल्या अवस्थेत दिसून आला. मंदिराकडे दर्शनासाठी गेलेल्या काही भक्तांना नंदीची विटंबना केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तातडीने खानापूरमध्ये कडकडीत बंद पाळला गेला. यावेळी विटा पोलीस व खानापूर पोलिसांनी संपूर्ण शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.



खानापूर तालुक्यातील खानापूर येथील पापनाशिनी ओढयाच्या काठावरील प्राचीन महादेव मंदीरामध्ये श्री शिवशंभू महादेवांची पिंड आहे. या पिंडीसमोर काही अंतरावर दगडी नंदी वसवला आहे. या नंदीची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केल्याचे लक्षात आल्यावर खानापूर शहरात कडकडीत बंद पाळला गेला. मंदिर परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. शहरात तणावाची परिस्थिति निर्माण झाली. शुक्रवारी खानापूरचा आठवडी बाजार होता, परंतु सदर घटनेने सर्वत्र शांततेचे वातावरण निर्माण झाले. विटा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तहसिलदार योगेश्वर टोंपे सह विटा पोलीस ठाण्याचे पो. नि. धनंजय फडतरे यांना शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सह अन्य संघटनांनी निवेदन देऊन या घटनेचा छडा लावून समाज कंटकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली.

याप्रकरणी मंदिराचे पुजारी महेंद्र भरतराव भगत यांनी खानापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. कोणीतरी अज्ञात इसमाने धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने पापनाशिनी ओढ्याच्या काठावरील प्राचीन महादेव मंदीरातील नंदीची दोन्ही शिंगे मोडून नंदीचे मुर्तीचे नुकसान केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुरनं– २१८/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २९८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि येळेकर करत आहेत.

### हिंदू संघटनांचे पोलिसांना निवेदन

खानापूरतील प्राचीन महादेव मंदिरातील दगडी नंदीबैलाच्या शिंगावर घाव घालून पांढऱ्या कापडाने दगडी नंदीबैल बांधण्यात आला. या घटनेनंतर खानापूर शहर कडकडीत बंद पाळण्यात आला. दुपारपर्यंत तणावाचे वातावरण होते. खानापूर शहराला पोलीसांचे छावणीचे स्वरूप आले होते. पो. नि. धनंजय फडतरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तहसिलदार योगेश्वर टोंपे सह विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांना शिवप्रतिष्ठान हिंदु संघटनांसह अन्य संघटनांनी निवेदन देऊन या घटनेचा छडा लावून अज्ञातावर कारवाई करावी. ज्या समाजकंटकाने हा प्रकार केला आहे, त्याच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली. सकाळपासून शुक्रवारचा आठवडा बाजार बंद ठेवण्यात आला. मंदिर परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विटा पोलीस व खानापूर पोलीस या संपूर्ण शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.

# पाकिस्तानविरुद्ध कठोर कारवाई करा

## कराडच्या मुस्लिम बांधवांची मागणी; पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा नोंदवला निषेध

**कराड/प्रतिनिधी : -** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील घटना अमानवीय आणि निंदनीय असून भारताच्या एकतेला व शांततेला आव्हान देणारी आहे. या हल्ल्याचा कराड शहरातील मुस्लीम बांधवांनी तीव्र निषेध व्यक्त करीत दहशतवादी हल्ला करणाऱ्या पाकिस्तान विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कराड शहर मुस्लिम जमातीच्या वतीने करण्यात आली आहे.

सदर मागणीचे निवेदन राष्ट्रपती यांच्या नावे कराड शहर मुस्लिम जमातीच्या वतीने तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष अल्ताफ शिकलगार, हारून तांबोळी, बरकत पटवेकर, रमजान कागदी, मन्सूर तांबोळी, साबीरमिया मुल्ला, अबुबकर शेख, कैस काजी, मजीद आंबेकरी, हाजी नदीम सुतार, हाजी मजहर कागदी, हाजी इरफान सय्यद, अहमद मोमीन उपस्थित होते.



कराड : नायब तहसीलदार यांना निवेदन देताना अल्ताफ शिकलगार, मजहर कागदी, साबीरमिया मुल्ला व इतर.

या निवेदनात म्हटले आहे की, पहलगाम, जम्मू आणि काश्मीर येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण राष्ट्र हादरले आहे. या भ्याड हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांना, मुख्यतः पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले. ही घटना केवळ अमानवीय आणि निंदनीयच नव्हे, तर भारताच्या एकतेला आणि शांततेला आव्हान देणारी आहे. या हल्ल्याचा आम्ही सर्व भारतीय कराड शहरातील मुस्लीम बांधव तीव्र निषेध व्यक्त करतो. या हल्ल्यात आपले प्रियजन गमावलेल्या कुटुंबियांप्रती आम्ही संवेदना व्यक्त करतो. त्यांच्या दुखात आम्ही सहभागी आहोत आणि जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो. या दुःखद प्रसंगी संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. भारत सरकारने या हल्ल्याच्या मुळाशी जाऊन, दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच सरकारने पाकिस्तानविरुद्ध ठोस पावले उचलून दहशतवादी तळ नष्ट करावेत, आंतरराष्ट्रीय दबाव वाढवून आवश्यक असल्यास लष्करी कारवाई करावी, अशी मागणी सदर निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# वाहनाची काच फोडल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:** तालीम संघ रस्त्यावर काही कारण नसताना चारचाकीची काच फोडून नुकसान केल्याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. क्षीतिज संतोष पवार (रा. मंगळवार पेठ, सातारा) याने तक्रार दिली असून, साहिल इनामदार, अफताब महाडवाले आणि राज (सर्वांचे पूर्ण नाव आणि पत्ता माहीत नाही) यांच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे. दि. २४ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास हा प्रकार घडला.


**अॅड. स्वाती भिमराव पवार.**
**अॅडव्होकेट व नोटरी (भारत सरकार)**
**रा. पवार कॉलनी, स्वा,सै. शामराव पाटील भाजी मार्केट समोर, बैल वाजार, मलकापूर रोड ,कराड ता. कराड, जि. सातारा.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः जि. सातारा कराड शहर व गोटे ता.कराड जि. सातारा व आसपासच्या पंचक्रोशीतील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

आमचे अशिल १) श्री. सुरेश शेखर शेट्टी २) सौ बिना सुरेश शेट्टी. रा. मुंढे, ता.कराड, जि. सातारा यांचे खरेदी मालकीची बिनशेती मिळकत आहे. त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे

जिल्हा सातारा, तालुका कराड पैकी मौजे मुंढे ग्रामपंचायत हद्दीतील मुंढे ता. कराड, जि. सातारा येथील भूमापन क्र. ८२९/२/ प्लॉट नं. १ याचे क्षेत्र १०१५.०० चौ. मी आकार १०१ रू ५० पै संपुर्ण सबंध हिस्सा बिनशेती वाणिज्य प्लॉट यांसी चतुःसिमा पूर्वेस पुणे बेंगलोर सर्विस रोड, दक्षिणेस न.म.पैकी राहुल प्रल्हाद कुलकर्णी यांची मिळकत, पश्चिमेसः श्री. पवार यांची मिळकत, उत्तरेस पाणंद रस्ता अशी संपूर्ण विनशेती मिळकत सदर मिळकत आमचे अशिलांनी श्री विद्याधर गोपाळ दिक्षीत यांचेकडून रजि. खरेदी दस्त क. २२३०/२०१२ अन्वये ता. २९/०५/२०१२ रोजी खरेदी केली आहे. श्री विद्याधर गोपाळ दिक्षीत यांनी नुरजहॉं सलीम नदाफ यांचेकडून रजि खरेदी दस्त क्र ४३५६/२०११ अन्वये ता. १३/१०/२०११ रोजी खरेदी केली होती, नुरजहॉं सलीम नदाफ यांनी खालीद इब्राहीम मोमीन यांचेकडून रजि खरेदी दस्त क्र २९५९/२००९ अन्वये ता. १५/०७/२००९ रोजी खरेदी केली होती. सदर खरेदीपत्राची मुळ दस्ताची प्रती आमचे अशिलांकडून शनिवार पेठ कराड येथून ता.२८/०८/२०२४ रोजी गहाळ झालेली आहे. रजि. खरेदी दस्त क्र. २२३०/२०१२ बाबत त्यांनी कराड शहर पोलिस ठाणेस गहाळ नोंद क्रमांक १८८८/२०२४ ता. २९/१०/२०२४ अन्वये तक्रार नोंदवली आहे. तसेच रजि. खरेदी दस्त क्र. ४३५६/२०११, २९५९/२००९ बाबत त्यांनी कराड शहर पोलिस ठाणेस गहाळ नोंद क्रमांक ७७२/२०२५ ता. २३/०४/२०२५ अन्वये तक्रार नोंदवली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही गैरवापर झाल्यास आमचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच वरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत मिळुन आलेस खाली दिले पत्यावर खरेदी दस्त क्र. २२३०/२०१२ तसेच खरेदी दस्त क्र. ४३५६/२०११, २९५९/२००९ मुळ खरेदीदस्ताचे कागदपत्रासहीत समक्ष भेटुन संपर्क करणे. येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली असे.

ता. २३/०४/२०२५.

**सही/-**
**अशिलातर्फे अॅड.**
**अॅड. स्वाती बी.पवार**



**महापारेषण** — **ई–निविदा सूचना (दुसरी वेळ)**

अ.उ.दा. संवसु मंडल, कराड अंतर्गत ***"Work of supply & replacement of various 33kV equipments at 220kV Vankuswade Sub-Station under EHV O&M Dn., Karad"*** कामाकरिता नामांकित कंत्राटदारांकडून फेर ई–निविदा मागविणेत येत आहेत. निविदा आर.एफ.एक्स. क्रमांक. ७०००0३६१२८. नोंदणीकृत कंत्राटदार विहित नमुन्यातील कोरी निविदा प्रत **http://srmetender.mahatransco.in** या वेबसाईटवरून डाऊनलोड करून घेवू शकतील.

**(१) कोरी निविदा डाऊनलोड करणेची मुदत :–** २५–०४–२०२५ ते ०५–०५–२०२५ **(२) निविदा स्विकारणेची अंतिम तारीख व वेळ :–** ०५–०५–२०२५ दुपारी १.०० वाजेपर्यंत. **(३) निविदा उघडणेची तारीख व वेळ :–** ०५–०५–२०२५ दुपारी २.३० वाजता. टेकनिकल बीड व ०६–०५–२०२५ दुपारी २.३० वाजता कमर्शिअल बीड (उपलब्धतेनुसार)

जादा माहितीसाठी www.mahatransco.in या वेबसाईटवर पहावे. कोणतेही कारण न दाखविता एखादी अथवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**अधीक्षक अभियंता,**
**अउदा संवसु मंडल, कराड**


# युपीएससी परीक्षेत कु.अंकिता पाटील चा राज्यात १५ वा क्रमांक

## सिंहगड इन्स्टिट्यूट संचालक प्रकाश पाटील यांच्याकडून अभिनंदन आणि शुभेच्छा

**कराड/प्रतिनिधी:** सिंहगड इन्स्टिट्यूट, पुणेचे संचालक प्रकाश राजाराम पाटील यांचे भाचे अनिल सखाराम पाटील (आरटीओ, मुंबई) यांची कन्या कुमारी अंकिता अनिल पाटील ही युनियन पब्लिक सर्विस कमिशन, दिल्ली युपीएससी या स्पर्धा परीक्षेत मुंबईमध्ये २ रा क्रमांक, महाराष्ट्रात १५ वा क्रमांक,व देशामध्ये ३०३ क्रमांकाने दि. २२ एप्रिल रोजी उत्तीर्ण झाली. कु. अंकिताच्या यशाबद्दल तिच्यावर सर्व थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



कु. अंकिता अनिल पाटील यांनी त्यांच्या यशाबद्दल म्हटले आहे की, मी दिवसातून ८- १० तास अभ्यासात मेहनत घेतली. तसेच स्मार्ट वर्कला प्राधान्य दिले. दररोज नियमित अभ्यास करत होते. गेली तीन ते चार वर्षे मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. आई- वडिलांनी मला या काळात पूर्ण पाठींबा दिला. मी माझे ध्येय गाठले याचा आई-वडिलांना जास्त आनंद झाला. तसेच अंकिता हिने स्पर्धा परीक्षेला बसलेल्या व बसू इच्छित असलेल्या विद्यार्थ्यांना संदेश देताना म्हटले आहे की, ज्या मुलांना स्पर्धा परीक्षा द्यायची आहे त्यांनी अभ्यासात खूप मेहनत घ्यावी. हीच यशस्वी होण्याची चावी आहे. फक्त मेहनत नाही तर स्मार्ट वर्कही महत्वाचे आहे. परीक्षा देताना अपयश आले तर खचून न जाता नव्या जोमाने काम करा.

कुमारी अंकिता अनिल पाटील ही युपीएससी, दिल्ली या स्पर्धा परीक्षेत मुंबईमध्ये २ रा क्रमांक, महाराष्ट्रात १५ वा क्रमांक,व देशामध्ये ३०३ क्रमांकाने दि. २२ एप्रिल रोजी उत्तीर्ण झाली. कु. अंकिताने अभूतपूर्व यश मिळवले. तिच्या यशाबद्दल तिच्यावर सर्व थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सिंहगड इन्स्टिट्यूट, पुणेचे संचालक प्रकाश राजाराम पाटील यांनी तिचे विशेष अभिनंदन केले. तिच्या या यशाबद्दल सर्व कुटुंब व युनिक अकॅडमी, मुंबई यांचेही अभिनंदन होत आहे.

# रविवारी कराडला रुग्णांचे हक्क व अधिकारांवर व्याख्यान

**कराड/प्रतिनिधी : -** माजी खा. स्व. प्रेमलाताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट व संकल्प सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवार (दि. २७) रोजी रुग्णांचे हक्क व अधिकार या विषयावर रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांचे जाहीर व्याख्यान आहे. सौ. वेणूताई चव्हाण सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या या व्याख्यानासाठी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.




या व्याख्यानात उमेश चव्हाण हे कराड व परिसरातील नागरिकांना वैद्यकीय मदत कशी मिळवावी, शासनाच्या उपचार व शस्त्रक्रियांसाठी लाखो रुपयांच्या योजना कोणत्या, रुग्णांचे हक्क व अधिकार काय आहेत, कोणत्या हॉस्पिटलमध्ये रुग्णांचे संपूर्ण बिल माफ होते आदी महत्वाच्या विषयांवर व्याख्यान देणार आहेत. यावेळी सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# डॉ.किरण मोघे माहिती उपसंचालक पदी रुजू

**पुणे/प्रतिनिधी:** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. किरण मोघे यांची माहिती उपसंचालक पदी पदोन्नती झाल्याने त्यांनी पुणे विभागीय माहिती उपसंचालक पदाचा कार्यभार स्विकारला. प्रभारी उपसंचालक श्रीमती वर्षा पाटोळे यांच्याकडून त्यांनी उपसंचालक पदाचा पदभार स्विकारला.

डॉ. मोघे हे यापूर्वी मुख्यमंत्री सचिवालयात जनसंपर्क अधिकारी तथा माहिती अधिकारी म्हणून तर नांदेड, रत्नागिरी, नंदूरबार, अहिल्यानगर, नाशिक तसेच पुणे येथे जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्यरत होते. त्यांच्याकडे नाशिक विभागीय माहिती उपसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला आहे.



प्रभारी उपसंचालक श्रीमती पाटोळे यांनी प्रभारी उपसंचालक म्हणून चांगले काम केल्याचे यावेळी उपसंचालक डॉ. मोघे यांनी नमूद केले. सामुहीक प्रयत्नातून सर्वांनी कार्यालयाचे कामकाज अधिक चांगले होईल असे प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

श्रीमती पाटोळे आणि कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी डॉ.मोघे यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ.रविंद्र ठाकूर, माहिती अधिकारी सचिन गाढवे,प्रदर्शन सहायक विलास कसबे, वरिष्ठ लिपिक सचिन बहुलेकर, वैशाली रांगणेकर, स्वाती साळुंके, सुहास सत्वधर, सुवर्णा पालकर, आराध्या लोंढे, रावजी बांबळे, वर्षा कोडलिंगे आदी उपस्थित होते.

# करंजे येथे अंगणातून मोबाईल चोरी

**सातारा/प्रतिनिधी:** मोळाचा ओढा येथील नंदन रेसिडेन्सीमधील एका घराच्या अंगणातून मोबाईलची चोरी झाली. याप्रकरणी सुधीर मोहन जाधव (रा. करंजे तर्फ मोळाचा ओढा सातारा) यांनी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, अज्ञात चोरट्याच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार दि. २१ एप्रिल रोजी सायंकाळी पाच ते साडेसात वाजण्याच्या दरम्यान घडला. पोलीस नाईक साबळे तपास करत आहेत.

# पाटण येथे सर्व धर्मीयांकडून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध

**पाटण/प्रतिनिधी:-** पाकिस्तानने केलेला हा भ्याड हल्ला फक्त आपल्या नागरिकांवर नाही तर आम्हां भारतीयांच्या सार्वभौमत्वावर केला आहे. आज पर्यंत आपण भारतीयांनी खुप सहन केले आहे. पाकिस्तान आणि पाकिस्तानचा हा अमानुष दहशतवाद मुळापासून उखडून टाकण्यासाठी आम्हीं सर्व भारत सरकार सोबत आहोत. आता प्रत्येकाने आपला राजकीय पक्ष, जात, धर्म, संघटना विसरुन आपल्या देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहाजी व देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह जो निर्णय घेतील तो मान्य करुन भारतीय म्हणून एक राहुया. पहलगाम काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ पाटण येथे बोलताना सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले.



यावेळी याज्ञसेन पाटणकर म्हणाले, या दहशतवाद्यांना भारतीय सरकारने कोणत्याही प्रकारची दयामाया न दाखवता त्यांना व त्यांना मदत करणाऱ्यांना शोधून काढून त्यांचा शेवट करावा. गेल्या १० वर्षात भारतात सरकारने केलेल्या विकासकामांमुळे काश्मीर मधील पर्यटन बहरले होते. तेथील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला होता. त्यामुळे येथील प्रत्येक काश्मीरी नागरीक स्वतःला भारतीय समजू लागला होता. हेच पाकिस्तानला पहावले नाही आणि त्यांनी येथील लाखो स्थानिक काश्मीरी नागरिकांच्या रोजगारवर घाला घातला.

आज येथील रोजगार बुडाल्यामुळे येथील लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. याला पाकिस्तानच जबाबदार आहे ये स्थानिक लोकांना समजले आहे. त्यामुळे काश्मीर मधील स्थानिक सुध्दा भारत सरकारच्या सोबत आहेत आता आपणही सर्व जण भारत सरकारच्या पाठीशी राहुया असे त्यांनी सांगितले. यावेळी पाकिस्तान व दहशतवाद्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

पाटण येथे सर्व धर्मीयांच्या वतीने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेल्या निष्पाप पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पाटण शहर व परिसरातील विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, संघटनांचे पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हॉटेल लंकाधिशवर झाड कोसळले

## वादळी पावसामुळे मोठे नुकसान

**चाफळ/प्रतिनिधी:** कळंत्रेवाडी,ता.कराड गावच्या हद्दीत पाटण पंढरपूर राज्य मार्गावर असलेल्या लंकाधिश या हॉटेलवर गत पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे हॉटेल जवळील महाकाय झाड बुंध्यातून उखडून कोसळले असून हॉटेलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गत पंधरा दिवसांपूर्वी या विभागात झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसानीच्या तुरळक घटना घडल्या होत्या.

सदर हॉटेल समोरील विद्युत खांब देखील कोसळला आहे. लंकाधिश हॉटेलवर कोसळलेले झाड गत पंधरा दिवसांपासून त्याच अवस्थेत असून या घटनेला पंधरा दिवस उलटूनसुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरचे झाड हटवले नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. बुंध्यातून पूर्णपणे उखडलेले महाकाय झाड त्या ठिकाणाहून हटवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे आता सार्वजनिक बांधकाम विभाग काय भूमिका घेणार ?हे येत्या काळात स्पष्ट होईल.



कळंत्रेवाडी: हद्दीतील हॉटेल लंकाधिशवर कोसळलेले महाकाय झाड (छाया-रघुनाथ थोरात)